करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.८२ | पाने-१२ | दि.१०/६/२०२२ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.

जनकल्याण फार्मा
मेडिकल & डिस्ट्रिब्युटर्स





ॲलोपॅथीक | जेनेरिक | आयुर्वेदिक | सर्जिकल | जनरल

तसेच त्वचा रोग, बीपी, शुगर वरील सर्व प्रकारची औषधे होलसेल व किरकोळ दरात मिळण्याचे एकमेव ठिकाण !



एसटी स्टॅन्ड समोर, करमाळा प्रोप्रा : अजिंक्य अनिल घरबुडे, मो.9527323743 /समाधान (8308620816)

# दुसऱ्या फळीतील नेते विधानसभेसाठी उत्सूक : खुपसे-पाटील, करे-पाटील, वारे, गुळवे जोशात








करमाळा : करमाळा विधानसभा निवडणूक हा.. हा.. म्हणता दोन वर्षावर येवून ठेपली आहे. नेहमीप्रमाणे पारंपारीक स्पर्धकाबरोबरच यावेळी दुसऱ्या फळीतील नेते या निवडणुकीची तयारी करत असल्याचे चित्र दिसत आहे. यात काहीजण राजरोसपणे तर काही छुप्या मार्गाने विधानसभेचा रस्ता शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

विधानसभेला विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांनी माढा तालुक्यातील ३६ गावातील पाठबळाबरोबरच जगताप गटाशी केलेली युती आणि करमाळा तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांचा आपल्या गटात करून घेतलेला प्रवेश यामुळे त्यांनी आपली बाजू मजबूत केली आहे. त्यांना शह देण्यासाठी माजी आमदार नारायण आबा पाटील यांनी जोरदार संघर्ष चालू ठेवला आहे. सत्ता नसूनही कार्यकर्त्यांची मूठ बांधण्यासाठी त्यांनी केलेले परिश्रम वाखणण्यासारखे आहेत. तिसऱ्या स्पर्धक बागल गटाच्या नेत्या रश्मीदिदी बागल याही आपल्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन विधानसभेच्या सत्तेचे गणीत जुळवण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहेत.

असे असलेतरी या पहिल्या फळीतील नेत्याशिवाय, दुसऱ्या फळीतील नेते विधानसभा-२०२४ हे टार्गेट समोर ठेवून दररोज नवे नवे उपक्रम राबवत आहेत. यामध्ये जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अतुल खुपसे-पाटील यांची जोरदार वाटचाल सुरू आहे. आपल्या संघटनेव्दारे सामाजीक प्रश्न व व्यक्तीगत प्रश्न सोडवण्याचा त्यांनी सपाटा लावला आहे. त्यापाठोपाठ यशकल्याणीचे संस्थापक अध्यक्ष गणेश करे-पाटील यांची सामाजिक वाटचाल चालू असलीतरी, त्यांनी अल्पावधीत वाढवलेला अफाट जनसंपर्क, दररोजच्या भेटगाठी, सोशल मिडीयावर सर्व नेत्यापेक्षा जास्त वावर आणि संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्या बरोबरच राजकिय कार्यकर्त्यांबरोबर वाढलेला संपर्क यामुळे त्यांची इच्छा नसलीतरी कार्यकर्तेच त्यांना या निवडणुकीत ओढण्याची जोरदार शक्यता आहे. राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष संतोष वारे हे गेल्या दोन वर्षापासून सतत सक्रीय आहेत. कोविड कालावधीत त्यांनी केलेले काम वाखणण्याजोगे आहे. रावगाव गटात त्यांनी ठेवलेला संपर्क (पान ३)

सचिव



श्री.गुलाबराव बागल
(याचिकाकर्ता नं.२)

समाजसेवा मित्र मंडळ, करमाळा संचलित

कर्मवीर आण्णासाहेब जगताप विद्यालय, करमाळा ही सोलापूर जिल्ह्यातील (बहुधा) एकमेव माध्यमिक शाळा असावी. जी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी म्हणून 'आरओ' चे शुध्द पाणी विद्यार्थ्यांना पिण्यास देत आहे. (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांनी केलेल्या उजनीच्या पाण्याच्या तपासणीमध्ये हे पाणी आंघोळीच्या लायकीचेही नाही. हे पाणी पिल्याने कॅन्सर सारखे रोग होऊ शकतात; असे प्रसिध्द केलेले आहे)

शुभ - आशिर्वाद (कैलासवासी विश्वस्त)



कै.दिगंबरराव बागल | कै.तात्यासाहेब घुमरे | कै.मच्छिंद्र पवार | कै.मिलींद बागल

अध्यक्ष | उपाध्यक्ष | खजिनदार | सहसचिव | विश्वस्त | विश्वस्त



श्री.कल्याण(आप्पा) शिंदे | श्री.दिगंबर सुर्यवंशी | श्री.सुभाष शिंदे | श्री.विलासराव घुमरे | श्री.बाळासाहेब देशमुख | श्री.राहूल बागल

मुख्याध्यापक



श्री.राजकुमार जगताप
(याचिकाकर्ता नं.१)

समर्थ साथ



श्री.अमोल(आबा) यादव | श्री.दुर्गेश राठोड | श्री.विजय सुपेकर | श्री.सिध्देश्वर मनसुके गुरूजी | श्री.बाबासाहेब देशमुख (संगमनेर)



ताशी ५०० लिटर पाणी शुध्द करणारे आरओ मशीन

विद्यालयातील शिक्षकांच्या पदोन्नतीचे व इतर अनेक प्रकारचे प्रस्ताव काही उपद्रव्यी लोकांच्या खोट्या तक्रारीमुळे शिक्षण खात्याने प्रलंबित ठेवले होते. म्हणून मुख्याध्यापक श्री.राजकुमार जगताप(याचिकाकर्ता नं.१) व संस्था सचिव श्री.गुलाबराव बागल (याचिकाकर्ता नं.२) यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून कोर्टाचे आदेश मिळवल्याने शिक्षण खात्याने पदोन्नतीचे व इतर सर्व प्रस्ताव मार्गी लावले आहेत. निकालाची उत्तम परंपरा असलेल्या या विद्यालयात प्रवेश घ्यावा !

जगात सत्ता, संपत्ती व संततीपेक्षा ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे,वाट्टेल तेवढे कष्ट करावे पण ज्ञान प्राप्त करावे...!

संपादकीय.........................................................

# शिक्षणाचं काय..?

"विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली। नीतीविना गती गेली। गतीविना वित्त गेले। वित्ताविना शुद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने केले॥"
असे महात्मा फुले यांनी १९ व्या शतकात म्हटले आहे. आज २१ वे शतक आहे. त्याकाळात अशिक्षीत व्यक्तींचे प्रमाण मोठे होते. मुली तर शिक्षण घेतच नव्हत्या म्हणूनच महात्मा फुले यांनी सावित्रीबाई यांना शिकवून पहिली मुलींची शाळा काढली. त्यानंतर मुली, मुले साक्षर झाले पण आज २१ व्या शतकात केवळ साक्षर असून चालत नाहीतर तो संगणक साक्षर असेलतरच त्याला साक्षर म्हणावे लागते. अन्यथा जगाच्या तुलनेत तो निरक्षरच ठरतो. खरंतर जगात सत्ता, संपत्ती व संततीपेक्षा ज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. वाट्टेल तेवढे कष्ट करावे पण ज्ञान प्राप्त करावे; असा पूर्वजांचा संदेश आहे. त्यानुसार तालुक्याचा विचार करता.., वर्तमानासाठी शेतीला पाणी, अर्थकारणासाठी औद्योगिकीकरण आणि भविष्याच्या प्रगतीसाठी अद्यावत शिक्षण यांची मोठी गरज आहे. या तीन बाबी प्रत्येक कुंटूबाच्या दृष्टीने जेवढ्या महत्वाच्या आहेत, तेवढ्याच तालुक्याच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहेत.

आपल्या तालुक्यात कृतीपेक्षा गाजावाजा मोठा असतो, हा आज पर्यंतचा अनुभव आहे. तालुक्याच्या आर्थिक प्रगतीसाठी शेतीला पाणी पाहिजे. पाणी उपलब्ध होऊ शकते परंतू ते मिळत नाही. कुकडीचे पाणी पाट झाले पण उपचाऱ्याचे निमित्त सांगून तालुक्याला गेल्या २० वर्षापासून पाणी मिळत नाही. कुकडीचे अधिकाऱ्यांनी यासाठी कधीच पाठपुरावा केला आणि लोकप्रतिनिधी कुकडीपेक्षा दहिगाव उपसासिंचनवर जादा लक्ष देत गेले. त्यामुळे कुकडीचा विषय मागे पडला आणि ४५ हजार एकर क्षेत्र बागायत होणाऱ्या या कुकडीच्या पाण्याचे मृगजळ झाले आहे.

औद्योगिकरणाचा विचार केला तर २५ वर्षापूर्वी संपादीत झालेल्या एम.आय.डी.सी.च्या जागेचे प्लॉटींग अद्यापही सुरू नाही. त्याचा प्लॅन कधी मंजूर होणार व ते प्लॉट कधी वितरण होणार ? त्यांनतर मोठमोठे उद्योजक केंव्हा येणार ? ज्याप्रकारे शेतीच्या पाण्याचे व औद्योगिकरणाचे झाले तीच गत तंत्रज्ञान शिक्षणाची आहे. तालुक्यात जिल्हा परिषदेच्या २२७ प्राथमिक शाळा आहेत. खासगी शाळा, दोन आश्रम शाळा, अनुदानीत ४७ माध्यमिक शाळा, विना अनुदानीत ३, मुकबधीर अपंग शाळा ३, स्वयंअर्थसह्य -३९ (इंग्रजी माध्यामिक), वरीष्ठ महाविद्यालय ३, औद्योगिक प्रशिक्षण संस्था १, अध्यापक विद्यालय, इंग्रजी माध्यमाच्या २ प्रशाला, उर्दू माध्यमाच्या १ शाळा, नगरपालिकेच्या ९ शाळा व उर्दू-१ अशा १० शाळा व २ साखर शाळा. तसेच करमाळा व झरे येथे बी.सी.ए. महाविद्यालय होते, आता नाही. आपल्याकडे कृषी पदवीका, पदवी महविद्यालय नाही. संगणकाच्या युगात बी.सी.एस., एम.सी.एस., शिक्षण देणारी महाविद्यालये नाहीत. एवढेच काय पण बारावीच्या मुलांना विज्ञान व सी.ई.टी.चे क्लास नसावेत यापेक्षा दुर्दैव ते काय..? खरंतर लवकरच शंभर टक्के बागायत होणारा हा तालुका आहे. येथील साखर कारखानदारी बहरणार आहे. तालुक्यात पॉलीटेक्नीक, इंजिनिअरींग, मेडीकल, आय.टी, डी.फार्मसी, बी.फार्मसी, लॉ कॉलेज व तत्सम शैक्षणिक सुविधा होणे आवश्यक आहेत. पण याबाबत कोणी प्रयत्न करीत नाही. आज पर्यंत आपल्याकडे घडले ते फक्त चालत्या गाडीला खिळ घालणे. आहे त्याच संस्था ताब्यात घेण्यासाठी काही प्रतिनिधींनी आपली शक्ती खर्च केली आहे व आजही त्यांचे वाद चालू आहेत. नव्या संस्था निर्माण करण्याची कुवत असताना केवळ माध्यमिक शाळा व डि.एड. काढून आपले नेतेगण थांबले ही बाब निश्चितच चुकीची आहे. एका सुभाषितकाराने म्हटले आहे की.. अन्नदानं महद्दानं विद्यादानं ततः परम् । अन्नेन क्षणिका तृप्तिर्यावज्जीवं तु विद्या॥ अन्नदान हे मोठे दान आहे, विद्यादान त्यापेक्षा मोठे दान आहे. अन्नाने थोडावेळ तृप्ती होते, विद्येने जन्मभर तृप्ती होते.

खरंतर जर काही करून दाखवायचे असेलतर चांगल्या शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. अनुकूल वातावरण असतानाही असे धाडस केले जात नाही; ही बाब विचार करण्याजोगी आहे. पुणे येथील डॉ.एम.एन.नवले यांनी भारती विद्यापीठाचा राजीनामा दिल्यानंतर हातात फारसा पैसा नसताना माळरान जमीन पाहिली. तेथे दूरदृष्टीने नव्या युगाचा मंत्र लक्षात घेऊन, सामाजीक गरज ओळखून 'सिंहगड संस्था' स्थापन केली. या संस्थेच्या नव्या-नव्या फॅकल्टी सुरू केल्या व दहा वर्षात तेथील संस्थेचा परिसर बदलून टाकून एका विश्वाला गवसणी घालण्याचे काम त्यांनी केले. तेथे त्यांनाही प्रचंड स्पधा, आर्थिक अडचण होती. पण दुरदम्य आशावाद व त्यासाठी मेहनत घेण्याची तयारी असल्यानंतर होऊ शकते, हे त्यांनी दाखवून दिले. त्यांचा आदर्श व मार्गदर्शन घेऊन आपल्या तालुक्यातील वाशिंबे येथील सुपुत्र प्रा.रामदास झोळ यांनी 'दत्तकला शिक्षण संस्था' काढून तांत्रीक शिक्षणाच्या सुविधा भिगवण येथे सुरू केल्या आहेत. तेथेही त्यांनी भव्य-दिव्य इमारती उभ्या केल्या आहेत. डॉ.नवले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सुरू असलेले कार्य उल्लेखनीय आहे. आपण फक्त वाद घालण्यात पटाईत आहोत. याचे उदाहरण द्यायचे झालेतर आदिनाथ कारखाना १९७१ ला स्थापन झाला. प्रत्यक्षात १९९३ ला सुरू झाला. तोपर्यंत चार निवडणुका व वेगवेगळे प्रशासक नेमले. त्यानंतरही असेच वाद वाढत गेले आणि जिल्ह्यात सर्वात जास्त नफ्यावर चालू शकेल; अशी नैसर्गीक स्थिती असलेला हा साखर कारखाना चक्क भाडेतत्वावर देण्याची वेळ आली. याला कोण जबाबदार ? केवळ एकट्या बागल गटाला जबाबदार धरून चालणार नाही. आपण सुध्दा तेवढेच जबाबदार आहोत; हे विसरून चालणार नाही. बाजार समितीच्या निवडणुकीचा इतिहास पाहता सतत न्यायालयीन लढाई बरोबरच स्थनिक मारामाऱ्याच्या नोंदी ठळक आहेत. किती दिवस असे वादावादीत आपण गुंतून रहाणार, हे लक्षात घेतले पाहिजे. माढा तालुक्यातील दोन सुपुत्रांनी येथे साखर कारखाने काढले व आपण आपले सहकाराचे साखर कारखाने बंद पाडण्यासाठी धडपड करतो. काय हा कसला प्रकार आहे..? प्रत्येक वर्षी जून मध्ये शाळा सुरू होताना नेते मंडळींना जागे करण्याचे काम आम्ही करतो. त्याचे कारण या वर्षाची संधी गेली निदान आत्तापासून कामाला लागून पुढील वर्षापर्यंत तरी नवे काही करता येईल का ? याचा विचार झाला पाहिजे.

'सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥' असे संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. त्याचा प्रत्यय खऱ्या अर्थाने प्रयत्न केलातर येऊ शकेल. आपल्या तालुक्यात तशी मनाने, धनाने, सत्तेने व जनशक्तीने मोठी असणारी माणसं आहेत. त्यांनी मनात आणले व त्यावर लक्ष केंद्रीत केले तर नवीन शैक्षणिक संस्था उभ्या राहून आपल्या भावी पिढ्यांची शिक्षणाची सोय होईल. जर मोठ्या माणसांना यामध्ये लक्ष घालता येत नसेलतर, छोट्या पण विचाराने मोठ्या असणाऱ्यांनी एकत्र येऊन असा चांगला प्रयत्न केला पाहिजे. सध्या लोकप्रतिनिधी आमदार संजयमामा शिंदे हे आहेत. ते वेगवेगळ्या कामासाठी प्रयत्न करत आहेत. त्याबरोबरच शिक्षण संस्थासाठी त्यांनी प्रयत्न केले पाहिजे. त्यांच्याकडे काही शैक्षणिक संस्था आहेत. त्यांनी त्याच्या शाखा काढून येथे उच्च तंत्रज्ञान शिक्षणाची सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. माजी आमदार नारायण पाटील यांच्याकडेही मोठी शिक्षण संस्था आहे. ते सतत कार्यरत आहेत, त्यांनी त्यांच्या संस्थेमार्फत उच्च तंत्रज्ञानाची शाखा काढावी. त्याचप्रकारे बागल व जगताप गटाकडेही शैक्षणिक संस्था आहेत. या सर्वांनी एक-एक विभाग सुरू करण्याचे ठरवलेतर तालुक्याची शिक्षणांची गरज पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# दुसऱ्या फळीतील नेते विधानसभेसाठी उत्सूक

केलेली कामे व त्याच माध्यमातून विधानसभेचे स्वप्न पाहात त्यांनी एक-एक पाऊल टाकण्यास सुरवात केली आहे. भाजपाचे तालुकाध्यक्ष गणेश चिवटे यांनी जोरदार लॉबींग केली आहे. गावपातळीपर्यंत वाढवलेला संपर्क, दुध व्यवसायाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलेला हात व भाजपाच्या सत्तेत सर्वसामान्यांची केलेली कामे या जोरावर ते विधानसभेच्या मार्गावर जात आहेत. बारामती अॅग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे हे पवार परिवाराचा चेहरा म्हणून या तालुक्यात वावरत आहेत. पवारांची मर्जी झालीतर ते विधानसभेला उभे राहू शकतात. त्यानुसार त्यांचा तालुक्यातील गावागावात असलेला संपर्क ही जमेची बाजू आहे. त्यामुळे ही नावे आघाडीवर आहेत. याशिवाय जर बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल यांनी निवडणूक लढवण्यास नकार दिल्यास मकाईचे चेअरमन दिग्विजय बागल हे सुध्दा निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. त्यांचे दौरे जोरदार सुरू आहेत. याबरोबरच माजी आमदार कै.नामदेवराव जगताप यांचे चिरंजीव व काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रतापराव जगताप हे पक्षाच्या माध्यमातून व तालुक्यातील वाढवलेल्या संपर्काच्या माध्यमातून विधानसभेचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतील. शिक्षण क्षेत्रात मोठी कामगिरी करणारे दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक प्रा.रामदास झोळ व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ.अरूण अडसुळ हे सुध्दा योग्य संधी मिळालीतर निवडणूक लढवणार आहेत. याशिवाय यदाकदाचित जगताप-शिंदे युतीत काही अडचण आलीतर जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप हे जगताप गटाकडून आगामी विधानसभा निवडणूक लढवतील यात शंका नाही. सध्यातरी दुसऱ्या फळीतून अशी नावे पुढे येत आहेत. यात आणखी कार्यकर्त्यांची भर पडू शकते.

पहिल्या फळीतील नेतेमंडळी या दुसऱ्या फळीला जमेत धरत नसलेतरी दुसऱ्या फळीतील नेते कधीही चमत्कार करू शकतात. जमलंच तर ते निवडून येऊ शकतात पण तशी शक्यता नसलीतरी ते खात्रीच्या माणसाचा पराभव सुध्दा करू शकतात हे महत्वाचे आहे. त्यामुळे सन २०२४ ची निवडणूक नेते मंडळींना वाटते तेवढी सोपी जाणार नाही, हे या शर्यतीतून दिसून येते.

# क.न.प तर्फे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ



करमाळा(सं.प्र.) : येथील करमाळा नगरपरिषदेतील पाच कर्मचारी ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले असून, त्यांचा सत्कार समारंभाचा कार्यक्रम पालिकेच्या वतीने नुकताच संपन्न झाला. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये प्रदीप नामदेव शिंदे, रमेश गणपत शिंगाडे, राजेंद्र हरिश्चंद्र माने, बाळू बाबूराव शिंदे, श्रीमती इंदुमती सैदू शिंदे यांचा समावेश असून, त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांनी, मित्र परिवार इ. आपल्या भावना व्यक्त करताना सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कुटूंबियांनी चांगले सांभाळावे, त्यांची काळजी घ्यावी व त्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे पुढील उर्वरित आयुष्य सुखासमाधानाने जगू द्यावे. त्यांना कुठल्याही प्रकारचे दुःख देवू नये; असे मत व्यक्त केले. करमाळा नगरपालिकेतून पाच कर्मचारी सेवानिवृत्त होण्याची ही पहिलीच वेळ आहे; असे संभाषणातून दिसून आले. याप्रसंगी मुख्याधिकारी बालाजी लोंढे यांनी सेवानिवृत्त सर्व कर्मचाऱ्यांचा शाल, फेटा, पूर्ण पोशाखासहीत सत्कार केला. तसेच त्यांच्या कामाचे कौतूक करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यालयीन प्रमुख दिगंबर देशमुख, दत्तात्रय घोलप, जब्बार खान, समीर नदाफ, विनोद राखुंडे, बदे साहेब, फिरोज शेख, मुळे साहेब, निखिल गुरसाळे, राजेंद्र झाडबुके, अभय देशपांडे, बाळासाहेब महाडिक, प्रदीप चौकटे यांचेसह पालिकेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वाती माने यांनी केले तर उपस्थितांचे आभार इसाक पठाण यांनी मानले.

कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद येथील प्रशिक्षित
मुळव्याध तज्ञ
डॉ.महेश घुगे M.B.B.S.,D.N.B.,(Gen.Surgery), FMAS
इंपल्स प्लस हॉस्पिटल, अहमदनगर
Ex Consultant, कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद
प्रत्येक महिन्याचा २ रा शुक्रवार (१०/६/२०२२) वेळ : सकाळी ११ वा.
स्थळ : घोलप हॉस्पिटल, घोलपनगर, करमाळा.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
होलसेल साडी डेपो
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
अॅड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186
• जेन्टस्/लेडीज कामगार पाहिजेत

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
फोन.222233, मो.नं.9423222266
डॉ.डी.बी.केमकर (M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
रविवारी बंद
उपलब्ध सुविधा...
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • एस्कॅन बायोमेट्री आणि केरॉटोमेट्री
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
• जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
• नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार • लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स् आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बँक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६

# १२ वी कला शाखेत स्नेहल किर्दाक दिव्यांत जिल्ह्यात प्रथम



करमाळा(सं.प्र.) : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील कला शाखेची विद्यार्थीनी स्नेहल संभाजी किर्दाक हिस बारावी परीक्षेत ८३.८३ टक्के गुण मिळाले आहेत. विशेष म्हणजे तिचा दिव्यांग गटातून सोलापूर जिल्ह्यात प्रथम तर महाविद्यालयात कला शाखेत व्दितीय क्रमांक आला आहे. कु.स्नेहल ही दिव्यांग असून तिने अहोरात्र कष्ट करून हे यश संपादन केले आहे. स्नेहल हीचा एक हात व एक पाय काम देत नसल्याने तिला इतरांपेक्षा अभ्यासाला अधिक वेळ द्यावा लागला. कोरोना काळातही ऑनलाइन अभ्यासाला बसून हातपाय जखडून जायचे, तरीही जिद्दीने अभ्यास करत होती. शिक्षकांनी शिकवलेले रेकॉर्ड पुन्हा-पुन्हा ऐकून तिने शिक्षण आत्मसात केले

> शिक्षकांनी व कुटूंबियांनी मला या यशासाठी सहकार्य केले. त्यामुळे मी सोलापूर जिल्ह्यात प्रथम आली आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे व माझे कष्ट यामुळे हे यश मी मिळवू शकले.
> ...कु.स्नेहल संभाजी किर्दाक

# पाथुर्डी वि.का.सोसायटीच्या चेअरमन पदी वैजिनाथ मोटे



करमाळा(सं.प्र.) : पाथुर्डी विविध कार्यकारी सोसायटी च्या चेअरमन पदी माजी आमदार जयवंतराव जगताप गटाचे कट्टर समर्थक वैजिनाथ आजिनाथ मोटे (सर) यांची बिनविरोध निवड झाली.

पाथुर्डी सोसायटीच्या संचालक मंडळामध्ये सुनिता मोटे, सुनिल मोटे, संजय शिंदे, पोपट मोटे, सतीश काळे, शरद दरगुडे, काशिनाथ दरगुडे, संजय कांबळे, बाबीर वाघे, चांगदेव मोटे, सदाशिव शिंदे यांचा समावेश आहे. चेअरमन, संचालक मंडळ यांचे अभिनंदन माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले.

# किल्ला विभाग येथील देविदास सुतार यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : किल्ला विभाग येथील रहिवाशी देविदास लक्ष्मण सुतार (पिंपळे) (वय-७९) यांचे ७ जुनला निधन झाले. त्यांचे मागे एक मुलगा, दोन विवाहित मुली, सुन व नातू-नात असा परिवार आहे. देविदास सुतार यांनी संपूर्ण आयुष्य कष्ट करून आपला परिवार नावारूपाला आणला. बैलगाडी बनविण्यासाठी ते प्रसिध्द होते. सोलापूर जिल्ह्यासह पुणे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्याकडून बैलगाडी बनवून घेतलेल्या आहेत. सा.कमलाभवानी संदेशचे संगणक ऑपरेटर हरी पिंपळे यांचे ते वडील होते.

॥ श्रीराम समर्थ ॥
श्री गजानन आयुर्वेद
डॉ.श्री.दिपक सुर्यकांत पाटील
मल्टीस्पेशालिटी स्पाईन ऑर्थो केअर सेंटर
डॉ.सौ.वैष्णवी दिपक पाटील
* आयुर्वेदाचे वरदान-ऋतू बदलानुसार "पंचकर्म"व्दारे शरीरशुध्दी *
- वमन / विरेचन -
* खालील आजारावर उपयुक्त *
वाढलेले वजन, आम्लपित्त, पोटाच्या तक्रारी, कफाचा त्रास, जुनी सर्दी, पिंपल्स, स्किन इन्फेक्शन सोरीयासिस, Eczema, वाढलेली उष्णता स्त्रीयांमधील पाळीच्या तक्रारी P.C.O.D., स्त्री-पुरुष वंध्यत्व, थायरॉइडचा त्रास इ.
* उपलब्ध सुविधा *
* प्रकृतीपरिक्षण-नाडीपरिक्षण
* पंचकर्मव्दारे शरीरशुध्दी
* प्रतिकारशक्ती वाढविणारी 'रसायन चिकित्सा'
* ऋतुचर्या-दिनचर्या मार्गदर्शन
* अनुभवी प्रशिक्षित केरळीयन पंचकर्म स्टाफ
'श्रीस्मरण' बिल्डींग, शाहूनगर(सेकंड लेन), श्री कमलाभवानी रोड, करमाळा. (मो.९८२२१९७४०९/९९७०७६५९४५)
www.spineorthoayurved.com shrideepak17@gmail.com shrigajananayurved Shri Gajanan Ayurved Multispeciality Spine Ortho Care

# करमाळ्यात राष्ट्रवादीकडून वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण




करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २३ व्या वर्धापन दिनानिमित्त करमाळा शहर राष्ट्रवादी कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आला. पक्षाच्या झेंड्याचे ध्वजारोहण शहराध्यक्ष ॲड.शिवराज जगताप यांचे हस्ते व राष्ट्रवादी पदवीधर संघाचे प्रदेश सदस्य नितीन झिंजाडे यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात ओ. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो.., पवार साहेब तुम आगे बढो.. या घोषणा देण्यात आल्या. यावेळीर राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कांबळे, तालुका अध्यक्ष शिवाजी जाधव, शहराध्यक्ष ओंकार पलंगे, किसान सेलचे चक्रधर शिंदे, केतन इंदुरे, आझाद शेख, संघटक जावेद शेख, खजिनदार अरूण टांगडे, सरचिटणीस फिरोज पठाण, कामगार सेलचे चंद्रकांत जगदाळे, राहूल रेगुडे उपस्थित होते.




पाथुर्डी विविध कार्य. सेवा सह.संस्थेच्या चेअरमन पदी
जगताप गटाचे समर्थक व आमचे मित्र
मा.श्री.वैजिनाथ आजिनाथ मोटे
यांचीबिनविरोध निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन



शुभेच्छुक
बालाजी इस्टेट एजन्सी, करमाळा.
NA प्रक्रिया, खरेदी-विक्री, दुकान-शेती, वास्तुशास्त्र, मोजणी-लेआऊट बांधकाम परवाना, खुले प्लॉट, भूसंपादन ना हरकत, रस्ता ना हरकत करून मिळेल.
राजेंद्र जगताप (९४२३०६९३५९), सुनील फुलारी(९९७५४०३३९९), दत्तात्रय भांडवलकर(९४२३३९१३३९)


परिशिष्ट B
(सोडत व प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दी-जाहीर सूचनेचा नमुना)

## करमाळा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२२

**• जाहीर सूचना •**

करमाळा नगरपरिषदेच्या सन २०२२ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती(महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे तसेच प्रभाग रचनेचे प्रारूप प्रसिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | वार : सोमवार<br>दिनांक - १३/०६/२०२२<br>सकाळी - ११.०० वाजता<br>स्थळ - मा.आ.जयवंतरावजी जगताप बहुउद्देशीय सभागृह, किल्लावेस |
| २ | आरक्षणाची अधिसूचना(कलम१० नूसार) रहिवाशांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविण्याकरीता वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदेच्या/नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | वार - बुधवार<br>दिनांक - १५/०६/२०२२ पर्यंत |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी हरकती व सूचना मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर करावयात. | वार - बुधवार दि.१५/६/२०२२<br>वार-मंगळवार दि.२१/०६/२०२२<br>दुपारी ३.०० वा. पर्यंत |

टिप : हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरीकांना सुनावणी करीता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

ठिकाण : करमाळा नगरपरिषद
दिनांक : १०/६/२०२२

**बालाजी लोंढे**
(मुख्याधिकारी)
करमाळा नगरपरिषद


प्रवेश..! प्रवेश..!! प्रवेश..!!!

*Become Software Professional - Join Us-And Shape your Carrear Join Leaders.... Not Followers...*

# डॉ.पी.डी.पाटील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँन्ड मॅनेजमेंट स्टडीज्, करमाळा



प्राचार्य जयप्रकाश बिले

B.C.A & PGDCA या अभ्यासक्रमासाठी तालुक्यातील एकमेव महाविद्यालय...

**यशस्वीरित्या B.C.A & PGDCA आठ बॅचेस पूर्ण**

**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये......**

- तज्ञ आणि अनुभवी प्राध्यापक वृंद • राष्ट्रीय सेवा योजना (NSS)
- सुसज्ज इमारत, खेळाचे मैदान आणि खेळाची उपकरणे
- परिपूर्ण संगणक लॅब व e-studies साठी प्रोजेक्टर सुविधा
- युवा-जागर अभियान अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना (Solt still and personality development) चे प्रशिक्षण
- तज्ञ व्यक्तीकडून वेळोवेळी नोकरी, व्यवसाय, शिक्षण, व्यक्तीमत्व विकासासाठी मार्गदर्शन आणि कार्यशाळा
- शिक्षण पूर्ण केल्यानंतर व्यवसाय आणि नोकरी मार्गदर्शन केंद्र (महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे Quagnitia आणि Teach Mahindra मध्ये निवड)
- I.C.T. मार्फत वेगवेगळ्या हायस्कुलमध्ये विद्यार्थ्यांची Computer Teacher म्हणून निवड.
- सुसज्ज आणि परिपूर्ण ग्रंथालय (३५०० पुस्तके आणि १० मासिके)
- MPSC, UPSC, BANK इ. परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी महाविद्यालयाचे स्वत:चे स्पर्धा परीक्षा तयारी वर्ग • उत्कृष्ट निकालांबरोबर गुणवत्ता पूर्ण शिक्षण
- कमवा आणि शिका योजना • इंग्रजी संभाषण मंडळ



फक्त वार्षिक १५००० रू. मध्ये ॲडमिशन
(कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून १२ वी उत्तीर्ण)
• SC, ST मोफत ॲडमिशन

- ICICI बँकेच्या कॅम्पस मुलाखतीमध्ये २२ विद्यार्थ्यांची निवड
- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी B.C.A. प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षासाठी प्रवेश देणे सुरू आहे.

माहिती व प्रवेश संदर्भात संपर्क
• डॉ.पी.डी.पाटील महाविद्यालय करमाळा • युवराज कॉम्प्लेक्स, वाय.सी.एम.रोड, करमाळा., जि.सोलापूर
• प्राचार्य जयप्रकाश बिले (९४२३०६७१४२) • सचिव युवराज बिले (९८२२६१४२४५) • प्रा.शरद जाधव(९०११६७११००)
• प्रा.सौ.बारसकर मॅडम(७७७५०३२८८७) • प्रा.खराडे सर (९९६०४६७८४५)

डॉक्टरेट पदवीचे मानकरी







वेणु कुमार चुक्ला

वर्ल्ड ह्युमन राईटस् प्रोटेक्शन कमिशन, नवी दिल्ली यांचे वतीने कालिंदा फाऊंडेशन, पुणे व वेणु व्यंकटेशा चॅरिटेबल ट्रस्ट रावगाव तसेच नियोजित श्री तिरूपती बालाजी मंदिर निर्माण समिती रावगाव चे संस्थापक/अध्यक्ष

**श्री.लक्ष्मण नेमचंद बुधवंत** यांना सामाजिक कार्याबद्दल डॉक्टरेट पदवी जाहीर केल्याबद्दल

## हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक

- कालिंदा फाऊंडेशन, पुणे
- वेणु व्यंकटेशा चॅरिटेबल ट्रस्ट, रावगाव
- श्री तिरूपती बालाजी मंदिर निर्माण समिती, रावगाव
- साईसृष्टी इन्फ्राटेक, महाराष्ट्र राज्य
- समस्त ग्रामस्थ, रावगाव
- शंभु उद्योग समुह, पुणे म.राज्य
- ग्रामपंचायत, रावगाव
- गांधी मेडिकल, करमाळा.
- लक्ष्मी मेडिकल, करमाळा.
- माऊली ग्राफीक्स, करमाळा.
- श्री अष्टोधरा शत:१०८ चुक्ला चॅरिटेबल ट्रस्ट, हैद्राबाद
- ज्योतिर्लिंग स्टोन क्रशर डोंबाळवाडी (प्रोप्रा. नलवडे बंधू)





पाथुर्डी विविध कार्य. सेवा सह.संस्थेच्या चेअरमन पदी जगताप गटाचे समर्थक व आमचे मित्र

**मा.श्री.वैजिनाथ आजिनाथ मोटे**

यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल

## हार्दिक अभिनंदन !



महाराष्ट्रातील 1st मोबाईल रिटेल चेन TELEPHONE SHOPPEES घेऊन आली आहे खास ऑफर

महाराष्ट्रात पहिल्यांदाच

ट्रिपल कॅशबॅक ऑफर

· Cash Back Offer On ·

CREDIT & DEBIT CARD / EMI / CASH PAYMENT

· Up to - 9000/- Cashback · Up to - 7000/- Cashback · Up to - 10% Cashback

Special Offer (Limited Time)

Smart Watch ~~Rs.5900/-~~ Rs.1999/- · Neckband ~~Rs.2000/-~~ Rs.499/- · Mega Bass Speaker ~~Rs.1800/-~~ Rs.299/- · CHONCHOO Wired HF ~~Rs.600/-~~ Rs.99 · COOKER · MIXER · MOBILE · OTG

अगदी फ्री

औंध, चिंचवडी, बारामती, डेक्कन, दौंड, कोथरुड, एनआयबीएम रोड, पौड रोड, वाघोली, सदाशिव पेठ, सिंहगड रोड, सासवड, विमाननगर, करमाळा, राशिन, सांगोला, सोलापूर. डिस्ट्रिब्युशन हब- खराडी, हिंजेवाडी, भोसरी, विश्रांतवाडी

Helpline No 9881930003 / 9881930009

महाराष्ट्रातील पहिली मोबाईल रिटेल चैन

TELEPHONE SHOPPEES

शुभेच्छुक

युनियन बँकेसमोर, डॉ.जवळेकर दवाखान्या शेजारी, मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर



# डॉ.जांभळे पॅथॉलॉजी लॅब, करमाळा.

पहिल्या मजल्यावर फ्लॅट क्र.७, विकी प्लाझा, बस स्टॅन्ड समोर, नौशाद कोल्ड्रींक वर, करमाळा

Mob: 9561771415, Land line : 02182-220122

**SUMMER OFFER May & June**

**डॉ.निलम जांभळे**

M.B.B.S. MD(Pathology) mumbai
Consulting Pathologist (Reg No.2011/04/1035)

### HEALTHCHECK 1

TOTAL TEST (48)



- CBC (17)
- IRON STUDY (4)
- HbA1c (2)
- LIPID PROFILE(8)
- LIVER FUNCTION TEST (10)
- KIDNEY FUNCTION TEST (4)
- THYROID FUNCTION TEST (3)

MRP ~~2500/-~~ 50% off MRP 1250/-

| | | | |
|---|---|---|---|
| Double Marker | ~~1600/-~~ | 30% | 1120/- |
| Triple Marker | ~~1800/-~~ | 30% | 1260/- |
| Thyroid Function Test (T3, T4, TSH) | ~~400/-~~ | 30% | 280/- |
| TORCH (8) | ~~1600/-~~ | 30% | 1000/- |
| LH, PSH, Prol | ~~1100/-~~ | 30% | 770/- |
| AMH | ~~1600/-~~ | 30% | 1120/- |

### Anaemia Profile

TOTAL TEST (25)



- CBC (17)
- RETIC COUNT (1)
- FERRITIN (1)
- IRON STUDY (4)
- Vit B12 (1)
- FOLIC ACID (1)

MRP ~~2500/-~~ 50% off MRP 1250/-

### HEALTHCHECK 2

TOTAL TEST (50)



- CBC (17)
- IRON STUDY (4)
- HbA1c (2)
- LIPID PROFILE(8)
- LIVER FUNCTION TEST (10)
- KIDNEY FUNCTION TEST (4)
- THYROID FUNCTION TEST (3)
- Vit D3 (1) Vit B12 (1)

MRP ~~4000/-~~ 50% off MRP 2000/-

| | | | |
|---|---|---|---|
| Vit B12 | ~~600/-~~ | 30% | 420/- |
| Vit D3 | ~~1000/-~~ | 30% | 700/- |
| HbA1c | ~~450/-~~ | 30% | 250/- |
| Free Thyroid Function Test (FT3, FT4, TSH) | ~~500/-~~ | 30% | 350/- |
| LIPID PROFILE (8) | ~~400/-~~ | 50% | 200/- |

1 2 3 4 5

SUMMER OFFER कुपन सोबत असणे आवश्यक आहे

SUMMER OFFER चा लाभ नांवनोंदणी करून सुध्दा घेऊ शकता !



भावपूर्ण
# श्रध्दांजली !

आमचे पिताश्री
**कै.देविदास लक्ष्मण सुतार (पिंपळे)**
यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, हीच
आमची ईश्वर चरणी प्रार्थना !

**दशक्रिया विधी** ➜ गुरूवार दि.१६/६/२०२२ रोजी सकाळी १० वा. सातनळाची विहिर, करमाळा येथे होणार आहे.

**शोकाकुल : हरी पिंपळे व पिंपळे परिवार, किल्ला विभाग, करमाळा.**

# शिवरत्न बजाज, जेऊर ता.करमाळा.

(Authorised Dealer for Bajaj Auto Limited) email ID : shivratnaauto@gmail.com

त्वरीत खालील पदे भरणे आहे

| क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | शिक्षण |
|---|---|---|---|
| १ | वर्कशॉप मॅनेजर | १ | डिप्लोमा/ITI |
| २ | स्टोअर इनचार्ज | २ | पदवी व संगणक ज्ञान |
| ३ | सर्व्हिस ॲडवायजर | १ | पदवी |
| ४ | टेली कॉलर | १ | बारावी |
| ५ | कॉम्प्युटर ऑपरेटर | २ | पदवी व टायपिंग कोर्स |

**मुलाखत दिनांक : २०/६/२०२२**



**संपर्क : 8975888188 / 9922044676**

'विश्वास' हीच आमची परंपरा..!

# वर्षा बॅग अँन्ड शुज सेंटर

प्रोप्रा : बाळासाहेब कांबळे
मो.9960077098
मो.7219818417

सर्व साहित्य योग्य दरात मिळण्याचे एकमेव ठिकाण

**बॅग होलसेल व रिटेल मिळतील.**

शालेय साहित्य — Classmate वहीवर 20% डिस्काऊंट मिळेल

ट्रॅव्हल बॅग

स्पोर्टस् शुज

स्कुल बॅग

ब्रॅन्डेड बुट-चप्पल

ऑफिस बॅग

लेडीज चप्पल

कॉलेज सॅक

पत्ता
एस.टी.स्टॅन्ड समोर, करमाळा. जि.सोलापूर.

लेडीज पर्स

# जाधव-पाटील हॉस्पिटल



**दि करमाळा अर्बन बँक शेजारी, मेनरोड, करमाळा.**

## पाहिजेत

आमचे हॉस्पिटल येथे खालील पदे भरण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1 | R.M.O | B.H.M.S. / B.A.M.S. |
| 2 | नर्सिंग स्टाफ | B.Sc Nursing GNM, ANM |

तरी गरजूंनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा..!

पत्ता
दि करमाळा अर्बन बँक शेजारी, मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर

संपर्क
मो.नं.9146843871, 9096653567

॥ अविरत सेवा हाच उद्देश॥

# जिजाऊ पॅथॉलॉजी लॅब



**जाधव-पाटील हॉस्पिटल, करमाळा.**

## पाहिजेत

| पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|
| Lab Technician | B.Sc micro Pg DMLT, DMLT |

तरी गरजूंनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा..!

पत्ता
दि करमाळा अर्बन बँक शेजारी, मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर

संपर्क
मो.नं.9146843871, 9096653567

# सामाजिक कार्याबद्दल लक्ष्मण बुधवंत यांना डॉक्टरेट पदवी जाहीर



करमाळा(सं.प्र.) : वर्ल्ड ह्युमन राईटस् प्रोटेक्शन कमिशन, नवी दिल्ली यांच्या वतीने कालिंदा फाऊंडेशन पुणे, वेणु व्यंकटेशा चॅरिटेबल ट्रस्ट रावगाव तसेच नियोजित श्री तिरूपती बालाजी मंदिर निर्माण समिती रावगावचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण नेमचंद बुधवंत यांना सामाजिक कार्याबद्दल डॉक्टरेट पदवी प्राप्त होत आहे. याचे वितरण ६ नोव्हेंबर २०२२ रोजी मुंबई येथे होणार आहे. लक्ष्मण बुधवंत हे आपल्या कालिंदा फाऊंडेशन पुणे तसेच वेणु व्यंकटेशा चॅरिटेबल ट्रस्ट रावगाव मार्फत विविध सामाजिक उपक्रम राबवित असतात. यामध्ये दरवर्षी रावगाव शेजारीच वाड्यावस्त्यांवर शालेय साहित्य वाटप, रूग्णालयात जावून रूग्णांना मदत तसेच फळे वाटप, दिवाळीमध्ये गोरगरीबांना फराळ वाटप, कोरोना काळात रूग्णांना मदत, रावगाव येथील नियोजित श्री तिरूपती बालाजी मंदिर बांधण्याचे उत्कृष्ट कामकाज ते करत आहेत. तसेच करमाळा तालुक्यातील भक्तांना दर्शनासाठी तिरूपती बालाजी दर्शन यात्रा घडवितात. अशा विविध कार्यक्रमाची दखल घेत वर्ल्ड ह्युमन राईटस् प्रोटेक्शन कमीशन नवी दिल्ली यांच्या वतीने ही डॉक्टरेट पदवी लक्ष्मण बुधवंत यांना मिळत आहे. या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# करमाळा शहरात शिवराज्याभिषेक दिन साजरा

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त छत्रपती चौकातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दहिदुधाने व पंचामृताने अभिषेक घालण्यात आला. तसेच मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराजांनी स्वराज्य कसे स्थापन केले व मुघलांच्या अत्याचारातून प्रजेला कसे मुक्त केले, बाराबलुतेदारांना बरोबर घेऊन स्वराज्य स्थापन केले याविषयी माहिती देण्यात आली. यावेळी उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांचे नेतृत्वाखाली यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील मुला-मुलींनी काढलेल्या शिवस्वराज्य रॅलीचे स्वागत शिवप्रेमींनी केले. याप्रसंगी सुधाकर लावंड, संजय शिंदे, शंभुराजे फरतडे, सचिन गायकवाड,



अतुल फंड, सचिन काळे, बंडू शिंदे, गणेश कुकडे, महादेव फंड, विजय लावंड, सचिन घोलप, अमोल यादव, नितीन घोलप, केतन इंदुरे, शशिकांत पवार, बापू घोलप, संभाजी सुरवसे, नितीन कटके, मराठा फोर्टचे अमोल पवार यांचेसह शिवभक्त उपस्थित होते.

प्रवेश! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश!!
अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट
इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)
टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे
किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

## आळजापूर वि.का.सोसायटीच्या निवडणुकीत

# जय हनुमान बहुजन विकास आघाडीचे सर्व उमेदवार विजयी



करमाळा(सं.प्र.) : आळजापूर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीत जय हनुमान बहुजन विकास आघाडीचे सर्वच्या सर्व उमेदवार विजयी झाले असून त्यांनी परिवर्तन शेतकरी विकास आघाडीच्या उमेदवारांचा पराभव केला आहे.

आळजापूर सोसायटीची निवडणूक जय हनुमान च्या वतीने ज्येष्ठ नेते डॉ.हरिदास केवारे यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आली. यामध्ये सर्वसाधारण गटाच्या आठ व इतर राखीव गटाच्या पाच अशा सर्वच जागेवरचे उमेदवार बहुसंख्य मताने निवडून आले आहेत.

विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे ... अर्चना रोडे, डॉ.दिपक केवारे, श्रीमंत काळे, पोपट लोंढे, राजेंद्र गपाट, अण्णा रोडे, अरूण रोडे, भाऊसाहेब रोडे, रेणुका रोडे, नवनाथ शेवाळे, दत्तात्रय टेंबाळे, सोनाली नवले, बिटाबाई गपाट.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक सौ.एस.के.मुंडे यांनी काम पाहिले. विजयी उमेदवारांचा सत्कार डॉ.केवारे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी ॲड.नितीन गपाट, युवराज गपाट, डॉ.गौतम रोडे, भास्कर रोडे, महादेव रोडे, चक्रधर रोडे, प्रमोद वाकळे, नवनाथ भालेराव आदीजण उपस्थित होते.

Jayprakash Bile Public School, Zare
Tal.Karmala, Dist.Solapur
In Collaboration With LEAD SCHOOL
Activity Based Intergrated Curriculum
CREATS THE BEST FUTURE FOR YOUR CHILDREN
Admission Open 2022-23 Nursery to Std. 8 th



1) World-class Curriculum
2) Digital Calssrooms
3) Special Focus On English as a skill
4) Parents and Students App
5) Student Progress Reports
6) Live Classes
7) Holistic Development
8) Certified Teachers
9) Remedial Planning
10) Scenic Enviornment
11) Bus Facility Available
12) Including Vedic Maths for the First time

CONTACT
* Secretary * Yuvraj Bile Mob.9822614245
* Director * Dr.Swati Bile Mob.8381009162
* Principal * Kharade D. M. Mob.9960467845
Kondalkar S.V. Mo.9881631740
Pardeshi A. B. Mo.9119447028
Salunke N. A. Mo.8459180267
Jadhav P. S. Mo.7775032887

# ओमीनीची मोटारसायकलस्वारास धडक

करमाळा(सं.प्र.) : ओमीनी चालकाची मोटारसायकलला जोराची धडक बसून झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील मत्स्य व्यवसाय करणारे शामसुंदर देविदास गायकवाड हे गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात १५ मार्च २०२२ रोजी सकाळी साडेआठ वाजता झाला होता. या अपघातानंतर दवाखान्यात दाखल असल्याने या घटनेची फिर्याद पोलीसात ५ जूनला दाखल झाली आहे. या प्रकरणी शामसुंदर देविदास गायकवाड (रा.भोसा, ता.जि.लातूर, ह.रा.ढोकरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १५ मार्चला सकाळी साडेआठ वाजता मासे विक्री करण्यासाठी शेलगाव(वांगी) येथे जात असताना वांगी नं.३ येथे बसस्थानकाजवळ ओमीनी कार एमएच १४ बीआर ६७६० वरील चालकाने माझ्या मोटारसायकलला समोरून जोराची धडक दिली. त्यात मी गंभीर जखमी झालो आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# कारच्या धडकेने वृध्दाचे निधन

करमाळा(सं.प्र.) : लघुशंकेला गेलेल्या वयोवृध्द व्यक्तीला कारने धडक दिली. त्यात गंभीर जखमी झालेल्या वृध्दाचे उपचार चालू असताना निधन झाले आहे. हा प्रकार ४ जूनला रात्री साडेआठ वाजता लव्हे-जेऊर रस्त्यावर घडला आहे. या प्रकरणी दादा भागवत माने (रा.जेऊर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ४ जूनला रात्री साडेआठ वाजता माझे वडील भागवत दगडू माने (वय-६०) हे जेवण करून लघुशंकेसाठी रस्त्याच्या पलिकडे गेले असताना लाल रंगाच्या चारचाकी कारने त्यांना जोराची धडक दिली. ते गंभीर जखमी झाल्याने आम्ही त्यांना तात्काळ करमाळा येथील कॉटेज हॉस्पिटलला आणले परंतू उपचार चालू असताना त्यांचे निधन झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## भावजयला काय शिकवते असे म्हणून

# तरूणीकडून महिलेस मारहाण

करमाळा(सं.प्र.) : माझ्या भावजयला काय शिकवते व तिला फुगवते असे म्हणत शेजारच्या महिलेस लाकडी काठीने मारहाण करून जखमी केले आहे. हा प्रकार ३ जून ला सकाळी दहा वाजता वडशिवणे येथे घडला आहे. यात अरूणा सुनील ढावरे (रा.वडशिवणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३ जूनला सकाळी दहा वाजता मी माझ्या घरासमोर भांडी घासत असताना माझ्या शेजारी राहणारी नम्रता महादेव काकडे ही कामानिमित्ताने आली व बोलत असतानाच तिची नणंद माया धनंजय माने (रा.वाडेगाव, ता.सांगोला) ही शिवीगाळ करत आली व तु माझ्या भावजयला काय शिकवतेस व कशासाठी फुगवते.. असे म्हणून तिने काठीने व लोखंडी पाईपाने मला मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## 'खेड्यातला नवरा नको गं बाई..' म्हणत

# मुंबईच्या युवतीनं चक्क हळदी धुवून लग्नातून केले पलायन

करमाळा(सं.प्र.) : खेड्यातला नवरा नको गं बाई.., म्हणत विनोद केला जातो. प्रत्यक्षात याची प्रचिती करमाळा तालुक्यातील नागरीकांना नुकतीच आली आहे. लग्न जमल्यानंतर कुंभेज फाट्यावर मंगल कार्यालयाचे बुकींग झाले आणि लग्नाची तारीख ३ जून २०२२, वेळ १२.३५ ठरली. २ जूनला वाशीनाका, मुंबई येथील नवरी कुंभेज येथे आली. हळदी लागल्या. रात्रभर वऱ्हाडकरांचा स्वयंपाकही झाला. सकाळी नवऱ्यामुलाला घोड्यावर बसवून देवाकडे पाठविण्याची तयारी चालू असतानाच नवरी मुलीने मला या खेड्यातल्या मुलाबरोबर लग्न करायचे नाही असे म्हणून चक्क मंगल कार्यालयातून नातेवाईकांसह पलायन केले. हा प्रकार कुंभेज येथील नागरीकांनी अनुभवला असून सर्वांनाच धक्का बसला आहे.

कुंभेज येथील मुलगा खासगी नोकरी करत असून त्याचे लग्न नात्यातील मुलीबरोबर (वाशीनाका मुंबई) जमले. लग्न जमवून तीन महिने झाले होते. मुलगा-मुलगी एकमेकाला भेटलेही होते. विशेष म्हणजे या दोघांनी करमाळा येथील कमलादेवीचे मंदिर तसेच सैराट फेम ९६ पायऱ्याची विहिर व सेल्फी पाईंट येथे भेट देऊन फोटोही काढले आहेत. दोन्ही बाजूकडून तशी जोरदार तयारी झाली होती. शहरातील मुलगी असल्याने मुलाच्या वडीलाने तिच्या पसंतीचे दागिणे, कपडे खरेदी केले होते. मुंबईच्या पाहूण्यांना ज्या प्रकरचा स्वयंपाक आवडतो त्या प्रकारच्या स्वयंपाकाची तयारी मुलाच्या वडीलांनी केली होती. डिजे पासून ते घोड्यापर्यंत आणि मंगल कार्यालय पासून ते भोजनावळी पर्यंत सर्व सुविधा पूर्ण केल्या होत्या. सकाळी साडेआठ पर्यंत स्वयंपाक तयार झालेला होता. पाहूणे मंडळीही जमा झालेली होती. २ जूनला रात्री हळदी लागल्या होत्या. त्यामुळे कुणाच्या मनात कोणतीही शंका नव्हती. अखेर परण्या नवरदेव काढण्याची तयारी चालू असतानाच मुलीने मला या खेड्यात लग्न करून रहायचे नाही. त्यामुळे मला हे लग्न नको.. असे म्हणत तिने नवरदेवाने दिलेली अंगठी फेकून दिली. चुडा काढला. लग्नातले अंगावरचे कपडे काढून, हळद धुवून ती आपल्या मावशीबरोबर चक्क तिच्या गावी निघून गेली. मुलाच्या घरची परिस्थिती सर्वसाधारण असल्याने लाखो रूपये केलेला खर्च वाया गेला. त्यानंतर मुलाकडील मंडळींनी पोलीस स्टेशन गाठले. त्यानंतर मुलीकडच्यांनी मुलगीच पळून गेलीतर आम्ही काय करणार ? असे म्हणून हातवर केले. थोडक्यात खेड्यातला नवरा नको गं बाई म्हणत.. मुलीने मुलाकडच्यांची मोठी फसगत केली असून, तालुक्यात या लग्नाची चर्चा सुरू आहे.

# कंपनीचे कंपाऊंड तोडल्याप्रकरणी चौघांविरूध्द पोलीसात गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : करमाळा-जेऊर रस्त्यावरील झरे फाट्यानजीक असलेल्या अमृता असोसिएटस् या कंपनीचे कंपाऊंड चौघा जणांनी बेकायदेशीरपणे तोडले आहे. या प्रकरणी पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार १४ मे च्या रात्री दहाच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी अमृता असोसिएटस्चे पार्टनर संजय नरहर खरूटे (रा.साईकृपा अपार्टमेंट, पर्वती, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की.. आमच्या अमृता असोसिएटस् या कंपनीचे कंपाऊंड १४ मे च्या रात्री दहा वाजता सुर्यकांत ढावरे, चंद्रकांत ढावरे व अन्य दोन अनोळखी लोकांनी ट्रॅक्टरच्या सहायाने तोडून नुकसान केले व वॉचमनला शिवीगाळ, दमदाटी केली. या प्रकरणी पोलीसांनी चौघाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# पोलीस असल्याचे भासवून ६८ हजाराचा ऐवज लंपास

करमाळा(सं.प्र.) : पोलीस असल्याचे भासवून दोघा जणांनी करमाळा शहरातील दूधवाल्यास फसवून ६८ हजार रूपयाचा ऐवज लंपास केला आहे. हा प्रकार करमाळा शहरातील कमलादेवीच्या रस्त्यावर ४ जुनला सकाळी नऊ वाजता घडला आहे. या प्रकरणी आजिनाथ देविदास राऊत (रा.चांदगुड गल्ली, करमाळा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी माझे दूध घालून जनावरे बांधलेल्या ठिकाणी कमलादेवीच्या रस्त्याने जात असताना कृष्णा हार्डवेअर समोर दोन अनोळखी इसमांनी मला थांबविले. आम्ही पोलीस आहोत, चौकशी चालू आहे. तुमच्या जवळील दागिणे असतीलतर ताबडतोब काढून ठेवा.. असे म्हणून माझ्या गळ्यातील सोन्याची चैन व हातातील घड्याळ काढून माझ्याच रूमालात गुंडाळून दिल्याचे दाखविले. परंतू त्यामध्ये ६८ हजार रूपये किंमितीची दीड तोळ्याची सोन्याची चैन आढळून आली नाही. या दोघांनी पोलीस असल्याचा बहाणा करून माझी फसवणूक केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# दुकानचे शटर तोडून ४० हजाराच्या केबलची चोरी

करमाळा(सं.प्र.) : जेऊर बायपास रोडलगत असलेल्या कृष्णा मशिनरी दुकानचे शटर तोडून चोरट्यांनी दुकानात प्रवेश करून फिनोलेक्स कंपनीचे ४० हजार रू. किंमितीची सबमर्सिबल केबल चोरून नेली आहे. हा प्रकार ३ जूनच्या मध्यरात्री घडला आहे. या प्रकरणी रोहित भिमराव कुटे (रा.साडे, ता.करमाळा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी म्हटले आहे, की जेऊर-बायपास रोड लगत कोंढेज चौकात कृष्णा मशिनरी नावाचे माझे दुकान असून त्या दुकानातून ३ जूनच्या मध्यरात्री चोरट्यांनी शटर उचकटून दुकानात प्रवेश करून ४० हजार रूपये किंमती फिनोलेक्स कंपनीची केबल चोरून नेली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# वयोवृध्द व्यक्तीला वाहनाची धडक

## उपचार चालू असताना निधन

करमाळा(सं.प्र.) : रस्त्याने कडेने जात असलेल्या वयोवृध्द माणसाला अज्ञात वाहनाने धडक देऊन झालेल्या अपघातात उपचार चालू असताना वयोवृध्द व्यक्तीचे निधन झाले आहे. हा अपघात २० म ला रात्री साडेसात वाजता जेऊर-करमाळा रस्त्यावर राठोड पेट्रोलपंपासमोर घडला आहे. यात रामेश्वर भिकाजी पाटील (रा.वरकटणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझे वडील भिकाजी आनंदराव पाटील (वय-८६) यांच्या डोक्यावर मानसिक परिणाम झालेला होता. यातच ते २० मे ला रात्री करमाळा-जेऊर रस्त्यावर आले. रस्त्यावरून चालत असताना राठोड पेट्रोल पंपासमोर त्यांना अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. त्यांनतर उपचारासाठी आम्ही वेगवेगळया ठिकाणाहून तेथे ससुण हॉस्पिटल पुणे येथे नेले. तेथे उपचार चालू असताना त्यांचे निधन झाले . पोलीसांनी अज्ञात वाहनाच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

## मोटारसायकलला पिकअपची धडक

# उपचार चालू असताना महिलेचे निधन

करमाळा(सं.प्र.) : मोटारसायकलला पिकअपने पाठीमागून येऊन जोराची धडक देऊन झालेल्या अपघातात महिलेचा उपचार चालू असताना मृत्यू झाला आहे. हा अपघात ३ जूनला सकाळी साडेदहा वाजता करमाळा-टेंभूर्णी रस्त्यावर एचपी पेट्रोल पंपासमोर घडला आहे. या प्रकरणी पोपट नारायण गायकवाड (रा.कवडेनगर, पिंपरी-चिंचवड, पुणे ह.रा. झरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३ जूनला सकाळी साडेदहा वाजता मी माझी मोटारसायकल क्र.एमएच ४५ एबी ३४०६ यावर बसून माझ्या पत्नीला झरे येथून डॉ.सुराणा यांच्या हॉस्पिटल ला जात असताना एचपी पेट्रोल पंपासमोर, पीकअप क्र.एमएच १३ डिक्यु ६६६३ ने आम्हाला पाठीमागून जोराची धडक दिली. त्यानंतर मी व माझी पत्नी दोघे गंभीर जखमी झालो. त्यानंतर माझ्या पत्नीला उपचारासाठी बार्शीला पाठविले. परंतू तेथे उपचार चालू असताना सायंकाळी साडेसात वाजता तिचे निधन झाले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# मांगी येथे ५९ हजाराची चोरी

करमाळा(सं.प्र.) : मुलगी झोपायला येणार आहे म्हणून दरवाजाला आतून कडी लावली नाही. याचा गैरफायदा चोरट्यांनी उठवला व घरात घुसून कपाटातील ५९ हजार रूपयाचा सोन्याचा ऐवज लंपास केला आहे. हा प्रकार ४ जूनला पहाटे तीच्या सुमारास मांगी येथे घडला आहे. या प्रकरणी शुभम दौलत बागल (रा.मांगी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ३ जून ला आम्ही घरामध्ये झोपलो असताना दुसऱ्या रूम मधून बहिण. आमच्या खोलीत झोपायला येईल म्हणून आईने दरवाजाला कडी घातली नव्हती. याचा गैरफायदा घेऊन ४ जूनला पहाटे तीन वाजता चोरट्यांनी बेडरूममध्ये घुसून कपाटाचे दरवाजे उचकटून कपाटातील ४७ हजाराचे मनी मंगळसूत्र व १२ हजाराची सोन्याची अंगठी असा ५९ हजार किंमतीचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## महात्मा गांधी ज्यु.कॉलेज ऑफ सायन्स
# बारावी विज्ञानचा ९९.४८ टक्के निकाल - सृष्टी मोहोळकर प्रथम


सृष्टी मोहोळकर


स्नेहल बिनवडे


प्रेरणा मोहोळकर

करमाळा(सं.प्र.) : येथील महात्मा गांधी ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्सचा बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९९.४८ टक्के लागला असून सृष्टी सुखदेव मोहोळकर (८९.५०) हीचा प्रथम क्रमांक आला आहे. व्दितीय क्रमांक स्नेहल श्रीराम बिनवडे (८७.५०), तृतीय क्रमांक प्रेरणा सुखदेव मोहोळकर (८३.५०) हिचा आला आहे. कॉलेजच्या ३८६ विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले तर प्रथमश्रेणी मध्ये १६२ विद्यार्थी, व्दितीय श्रेणीमध्ये २०२ तसेच पास श्रेणीमध्ये १ विद्यार्थ्याने यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करमाळा तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी आमदार जयवंतराव जगताप, विश्वस्त शंभुराजे जगताप, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, सचिव मंगेश तरकसे, प्राचार्य पोपट कापले, उपप्राचार्य बागवान सर, पर्यवेक्षक एस.टी.शिंदे, बी.के.पाटील, विभाग प्रमुख विजय पवार यांनी केले.

# बारावीच्या परीक्षेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे घवघवीत यश



करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल ९३.६३ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९०.७० टक्के तर कला शाखेचा निकाल ७०.१८ टक्के लागलेला आहे.

विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक प्रिती उगलमोगले (८४.१७), व्दितीय क्रमांक रोहिणी तोंडे (८२ टक्के), तृतीय क्रमांक महेश थोरात (८०.३३) यांचा आला आहे. वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक साईश्वरी भणगे (९१.३३), व्दितीय क्रमांक करुणा शेखर स्वामी (८९ टक्के), तृतीय क्रमांक समृध्दी यादव (८८.३३) हिचा आला आहे. कला शाखेत प्रथम क्रमांक साक्षी जगताप (९१ टक्के), व्दितीय क्रमांक स्नेहल किर्दाक (८३.८३), तृतीय क्रमांक अश्विनी ठोंबरे व अलोक राठोड (७३.८३) यांचा आला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, वरीष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ.अनिल साळुंके, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य लेफ्टनंट संभाजी किर्दाक यांनी केले.

# बारावी परीक्षेत आदिनाथ विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

करमाळा(सं.प्र.) : बारावीच्या परीक्षेत श्री आदिनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आदिनाथनगर चा शंभर टक्के निकाल लागला असून वैभवी खंडेराव जाधव (८१.९३) हिचा प्रथम तर पौर्णिमा लहू माने (८०.८३) हिचा व्दितीय क्रमांक आला आहे. तृतीय क्रमांक ऋतुजा सुनील धुमाळ (७९.३३), चौथा क्रमांक आरती पवळ (७९), पाचवा क्रमांक रेखा लोंढे (७७.८३) हिचा आला आहे. विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार शामलताई बागल, सचिव रश्मी बागल-कोलते, दिग्विजय बागल, प्राचार्य कांतीलाल माने यांनी केले.


## श्रीमान भाऊसाहेब झाडबुके इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कुल
हिवरवाडी रोड, करमाळा, जि.सोलापूर

### शिक्षक पाहिजेत

वरील शाळेत खालीलप्रमाणे शिक्षक पदे भरावयाची आहे. तरी पात्र उमेदवारांनी बुधवार, दि. १५/६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. आपली शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रे, मुळ व झेरॉक्स, अर्ज, फोटो इ. सह मुलाखतीस स्वखर्चाने शाळेच्या पत्त्यावर उपस्थित रहावे.

| क्र. | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता | पदे |
|---|---|---|
| १ | एच.एस.सी. डीटीएड | २ |
| २ | बी.ए./एम.ए./बी.एस्सी. | २ |

टीप : इंग्रजी माध्यमातून डी.टी.एड उत्तीर्ण व बी.ए., एम.ए. इंग्रजी विषयात उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य राहील.

चेअरमन
शाळा समिती, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके इंग्लिश मिडियम स्कुल

• संपर्क क्रमांक : ९७६७०८९७७५ / ९४२१०२१४८५ / ९९२११४२५८६

नर्सरी ते ४ थी च्या वर्गासाठी नवीन प्रवेश चालू आहे



## साई फिल्टर्स
रिपेअरींग/दुरूस्ती करून मिळेल.



सर्व प्रकारचे नवीन फिल्टर योग्य दरात मिळतील.

पत्ता : घोलपनगर, करमाळा. प्रोप्रा : गौतम दळवी (मो.८७६७६७७४७१)


# बारावी परीक्षेत कविटगाव येथे मुलीसह वडीलही उत्तीर्ण

करमाळा(सं.प्र.) : बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून कविटगाव येथील वडील व मुलगी एकाचवेळी बारावी पास झाले आहेत. कविटगाव येथील सरपंच विद्या सरडे यांचे पती पै.शिवाजी सरडे यांनी मच्छिंद्र नुस्ते विद्यालयातून १७ नंबरचा फॉर्म भरून बारावीची परीक्षा दिली. ते ७० टक्के गुण मिळवून पास झाले आहेत. त्यांची कन्या साक्षी शिवाजी सरडे ही शारदाबाई पवार विद्यानिकेतन बारामती येथे विज्ञान शाखेतून ८६.५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. वडील व मुलगी एकाचवेळी उत्तीर्ण झाल्याने कविटगाव परीसरात जोरदार चर्चा आहे.

# २३ जूनला सामुदायिक व्रतबंध संस्कार सोहळा

करमाळा(सं.प्र.) : ब्राह्मण महासंघ, श्रीदेवीचामाळ यांचे वतीने २३ जून २०२२ रोजी सकाळी ९ वा. २ मिनीटांनी आनंदी लॉन्स मंगल कार्यालय, पोथरे येथे सामुदायिक व्रतबंध संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. करमाळा तालुक्यातील सर्व ब्राह्मण समाज-बांधवांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा; असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने बाळासाहेब होसिंग यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या माहितीसाठी बाळासाहेब होसिंग (९०११४६३५०२), राजेंद्र सुर्यपुजारी (९७६३७६३७१८), श्रीनिवास पुराणिक (९४२३७९१२६४), सारंग पुराणिक (९४२३९८२९४५), निलेश गंधे (९२८४२६४२५२), अभय पुराणिक (८८८८५६७९७९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आदलिंगे यांचे काम उल्लेखनीय - मनोज गायकवाड



करमाळा(सं.प्र.) : पंचायत समितीचे विस्तार अधिकारी आदिनाथ आदलिंगे यांचे काम अत्यंत उल्लेखनीय होते व सर्वसामान्यांच्या कामासाठी ते जास्तीत जास्त वेळ देत होते. एवढेच नाहीतर ते सर्व ग्रामसेवकात आवडते विस्तार अधिकारी होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच ग्रामसेवक संघटनेने मोठा निरोप समारंभ आयोजित केला आहे; असे मत गटविकास अधिकारी मनोज गायकवाड यांनी व्यक्त केले.

करमाळा तालुका ग्रामसेवक संघटनेच्या वतीने सेवानिवृत्तीनिमित्त आदलिंगे यांचा सपत्नीक सत्कार आयोजित केला होता. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबूराव हिरडे, यशकल्याणीचे गणेश करे-पाटील, देविचामाळचे सरपंच महेश सोरटे होते, ग्रामविकास अधिकारी एन.एस. भुजबळ हे होते. यावेळी ग्रामसेवक संघटनेकडून आदलिंगे यांचा सपत्नीक कपड्याचा पोशाख व एक सोन्याची अंगठी दिली. याशिवाय यशकल्याणीकडून मानपत्र, ग्रामपंचायत देविचामाळ यांच्याकडून विशेष सत्कार तर आदलिंगे यांच्या नातेवाईक व मित्रपरिवारांनी त्यांचा यावेळी सन्मान केला. सुत्रसंचलन ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष सुशेन ननवरे यांनी तर सचिव दादासाहेब केवारे यांनी आभार मानले.


## जमीन विकणे आहे
करमाळा तालुक्यातील बिटरगाव(श्री) येथील गट नं.८१/१ क, करमाळा-जामखेड रस्त्याजवळ असलेली साडेपाच एकर बागायत जमीन विहिर, पाईपलाईन, लिंबू बाग ३५० झाडे, दोन एकर ऊस, अर्धा एकर शेततळे अशी संपूर्ण जमीन योग्य किंमतीत विकणे आहे.

संपर्क : नंदकुमार दळवी, मो.९४२१०२४५९४



PMC registered | ICMR approved | Fully computerised

SHRI GANESH CLINICAL LAB

## श्री गणेश क्लिनिकल लॅब
क.न.प.शाळा नं.२ शेजारी, डॉ.परदेशी हॉस्पिटल मेनरोड, करमाळा, जि.सोलापूर

संपर्क
मो.9665824731
मो.9657319721

रक्त-लघवी संबंधित सर्व तपासण्या अत्याधुनिक मशीनव्दारे सवलतीच्या दरात केल्या जातील.


मार्गदर्शक शिक्षिका
सौ.राधिका महेश होनकळसे
गुरूकुल पब्लिक स्कुलचा विद्यार्थी
चि.प्रतिक महेश होनकळसे याचा
मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत(इ.१ ली)
तालुक्यात व जिल्ह्यात प्रथम व राज्यात सहावा
क्रमांक आल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक : होनकळसे परिवार, करमाळा.


यशाची मानकरी
यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे उपप्राचार्य
संभाजीराव किर्दाक सर यांची कन्या व
यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थीनी
कु.स्नेहल संभाजी किर्दाक हिने
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत
(१२ वी कला- ८३.८३%) सोलापूर जिल्ह्यात
दिव्यांग गटातून प्रथम व महाविद्यालयात कला
शाखेत व्दितीय क्रमांक मिळविल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
● यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा.
● यशवंत परिवार, करमाळा., जि.सोलापूर
सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद


चेअरमन
पाथुर्डी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या
नूतन चेअरमन पदी जगताप गटाचे समर्थक
मा.श्री.वैजिनाथ आजिनाथ मोटे (सर)
यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
आमचे नेते
माजी नगराध्यक्ष
युवा नेते
संचालक मंडळ
सतीश काळे
शरद दरगुडे
सुनिता मोटे
सुनील मोटे
संजय कांबळे
सुजाता शेंदरकर
खंबीर साथ
खंबीर साथ
खंबीर साथ
खंबीर साथ
खंबीर साथ
खंबीर साथ
नंदा वाघे
सुमन नाळे
अजय लगस
भारत तोडेकर
कल्याण जानकर
अशोक खरात
संचालक : संजय शिंदे (व्हा.चेअरमन), चांगदेव मोटे, बाबीर वाघे, सदाशिव शिंदे, काशिनाथ दरगुडे, पोपट मोटे
शुभेच्छुक पाथुर्डी विविध कार्यकारी सेवा सह.सोसायटी मर्या; पाथुर्डी (सर्व सभासद व ग्रामस्थ)

# मिळालेले पद हे तालुक्याच्या विकासासाठी - हनुमंत मांढरे-पाटील

करमाळा : करमाळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष पद हे निष्ठा आणि जनतेची सेवा या माध्यमातून मिळालेले आहे. या पदाचा वापर मी तालुक्याच्या विकासासाठीच करणार आहे; असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नूतन तालुका अध्यक्ष हनुमंत मांढरे-पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनाच्यानिमित्ताने सा.कमलाभवानी संदेशशी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, की करमाळा तालुका हा अतिशय समजदार व्यक्तींचा आणि कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचा आहे. तालुक्यातील शेतीसाठी अद्यापही पाण्याची मोठी गरज आहे. कुकडीचे पाणी हे तालुक्याला मृगजळ ठरलेले आहे. हे पाणी करमाळा तालुक्यात अधिकृतपणे मिळण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच कर्जतचे आमदार रोहितदादा पवार यांच्या माध्यमातून आपण प्रयत्न करत आहोत. याबरोबरच तालुक्यातील गेल्या अनेक वर्षापासून रेंगाळलेली एम.आय.डी.सी.ची कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी आमदार संजयमामा शिंदे यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांच्या वीजेचा प्रश्न आजही गंभीर आहे. याकरीता आपण आमदार संजयमामा शिंदे तसेच आमदार रोहितदादा पवार यांच्या संपर्कात राहून तो प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात वीज व शेतीला पुरेसे पाणी तसेच उत्पादीत झालेल्या मालाला योग्य भाव या त्रिसुत्रीचा आपण पाठपुरावा करणार असून तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला




सर्वार्थाने न्याय देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आहे. हे पक्षाचे धोरण आपण अधिक सक्षमपणे तालुक्यासाठी वापरणार आहोत. तालुक्यात गटातटाचे राजकारण असलेतरी मी स्वत: मात्र फक्त पक्षाचे काम करत असून, श्रेष्ठींच्या आदेशानूसार तालुक्याची विकासात्मक कामाची गती वाढविणार आहे. याप्रमाणेच करमाळा शहरासह ग्रामीण भागात राष्ट्रवादी काँग्रेसच्या जास्तीत जास्त शाखा उभा करणार आहे. विशेषत: युवकांना यात सहभागी करून घेऊन पक्षाचे काम तळागाळापर्यंत पोहोचविणार आहे. तसेच सध्या पक्षाकडे असलेल्या सत्तेच्या माध्यमातून विकासाचे लोणही गावापर्यंत पोहोचविणार असल्याचेही श्री.मांढरे-पाटील यांनी सांगितले आहे.



हनुमंत शिवाजी मांढरे-पाटील (रा.सावडी) हे अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतून वाटचाल करत या पदापर्यंत आलेले आहेत. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण नातेवाईकांकडे फलटण येथे झाले. बारावीनंतर त्यांनी टू-व्हिलर दुरूस्तीचा कोर्स फलटणला पूर्ण केला. त्यानंतर सन १९९८-२००० या कालावधीत भिगवण येथे मोटारसायकल दुरूस्तीचे गॅरेज सुरू केले. त्यानंतर सन २००० ला त्यांनी करमाळा येथे गायकवाड चौकात अतिक्रमण जागेत टू-व्हीलर रिपेअरींगचे गॅरेज सुरू केले. या कालावधीत त्यांना रिपाइंचे नेते नागेशदादा कांबळे यांचे सहकार्य लाभले. दरम्यान सन २००२ ला रंभापुरा येथील ज्ञानदेव ढाणे यांची कन्या रेखा यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. त्यानंतर त्यांचे अतिक्रमणातील दुकान काढण्यात आले. पुढे जीन मैदानात गाळे झाल्यानंतर त्यांनी एक गाळा घेतला व तेथे टू-व्हीलरचे शोरूम केले. त्यातून त्यांची आर्थिक उन्नती झाली व त्यातच स्वत:ची जागा घेऊन बंगल्याचे बांधकाम केले आणि राजकारणातही त्यांनी कामकाज सुरू केले. सुरूवातीपासून आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब हे त्यांचे आदर्श असल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्येच काम करायचे ठरवून साधा कार्यकर्ता म्हणून त्यांनी आपल्या कामाची सुरूवात केली. सतत पक्षाशी एकनिष्ठ राहून पक्षवाढीसाठी प्रयत्न केले. पक्षाचे काम करत असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नेत्या रश्मीदिदी बागल यांचे सोबत तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून केले. त्यानंतर विधानसभाच्या कालावधीत अध्यक्ष म्हणून कामकाज सुरू केले. दरम्यान जिल्हापरिषदेच्या सत्तांतरात श्री.मांढरे-पाटील यांना कार्याध्यक्ष केले व संतोष वारे अध्यक्ष झाले. दरम्यान पदात फेरबदल झालातरीही मांढरे-पाटील यांनी आपल्या कामकाजात सातत्य ठेवले. त्यामुळे पुन्हा एकदा पक्षाने १५ मे ला त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष पद बहाल केले.

# योगाभ्यास



आधुनिक आणि धकाधकीचे जीवन यामुळे मानवी जीवनशैलीमध्ये विशेष बदल घडत आहेत. मात्र धावपळीच्या जीवनात आपण आपल्या स्वास्थ्याचा विचार करत नाही. आहार, विहार, निद्रा यामधील बदल व इतर बदलती जीवनशैली यामुळे आपण स्थौल्य, अनिद्रा, नैराश्य इ. पुष्कळ अशा व्याधींना आमंत्रित करत आहोत. परंतू अशा जीवनशैलीतही शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य उत्तम ठेवण्याचा मार्ग म्हणजे योग आहे. योग म्हणजे केवळ शारिरीक व्यायाम, आसने नाहीतर योग हा अथांग व विशाल असा समुद्रासारखा आहे. योगसाधनेची व्याप्ती खूप मोठी आहे. केवळ एका लेखात संपूर्ण विषय प्रस्थापित करणे अशक्यच आहे. या लेखात आपण योगशास्त्राविषयी अगदी संक्षिप्त स्वरूपात माहिती करून घेऊयात.

योगशास्त्र हे मानवी जीवनास सुखमय आणि उन्नत मार्ग दर्शवून आरोग्य उत्तम राखण्यास साहाय्य करते. शारीरिक, मानसिक, बौध्दीक, नैतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक स्वास्थ्य प्राप्ती ही योगाभ्यासामुळे होते. पातंजल योगदर्शन सांगते की.. योगश्चित्तवृत्ति निरोध: । म्हणजेच मनातील चंचल वृत्तीचे नियंत्रण करणे म्हणजे योग होय. चंचल, अस्थिर, मनाला शांत, स्थिर करणारी प्रक्रिया म्हणजे योग होय. योगाभ्यासाने आरोग्य उत्तम राहून बौध्दीक क्षमता प्राप्त होते. ताणतणावापासून मुक्ती मिळते. एकाग्रता वाढण्यास मदत होते तसेच इंद्रियांची कार्यक्षमताही वाढते.

नित्य योगाभ्यास करी व्याधिमुक्तता ।
देई आरोग्य सुख-शांती अन् प्रसन्नता ।।

परंतू या योगाभ्यासामध्ये नित्यता असणे आवश्यक आहे. केवळ काही दिवसच आसणे, प्राणायाम केल्याने उपयोग नाहीतर त्यामध्ये निरंतरता, नित्यता असायला हवी. नित्य योगाभ्यासामुलष मानवाचे आचार, विचार, कृती यामध्ये शुध्दता, पवित्रता प्राप्त होते.

योग म्हणजे सर्वसामान्यपणे प्रथमदर्शी व्यायाम, आसने आणि प्राणायाम यांचा विचार केला जातो. परंतू योग म्हणजे केवळ आसने आणि प्राणायाम नसून 'अष्टांग योग' असे आचार्यांनी वर्णन केले आहे. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि या आठ अंगांचा समावेश अष्टांग योगामध्ये केला आहे. यापैकी यम, नियम, आसन, प्राणायाम आणि प्रत्याहार या पाच अंगाला 'बहिरंग योग' तर धारणा, ध्यान आणि समाधि यांना 'अंतरंग योग' म्हणतात.

- **यम :** अष्टांग योगाचे प्रथम अंग यम म्हणजेच मानवता जागविणारा धर्म होय. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह यांना यम संज्ञा दिली आहे. हिंसेचा त्याग करणे (अहिंसा), नेहमी खरे बोलणे-वागणे (सत्य), चोरी न करणे(अस्तेय), कामभावनेवर नियंत्रण ठेवणे (ब्रह्मचर्य) व आवश्यकतेपेक्षा अधिक संग्रह करण्याच्या वृत्तीला विरोध करणे (अपरिग्रह) यांच्या समुहास 'यम' म्हटले आहे.
- **नियम :** स्वत:चे जीवन अनुशासनबध्द करणारा तसेच सुधारणा व परिवर्तन घडवून आणण्यासाठी आखलेला मार्ग अथवा कर्तव्यांचा समुह म्हणजे नियम होय. शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वर प्रणिधान यांच्या समुहास 'नियम' संबोधले आहे. शारीरिक व आंतरिक शुध्दी म्हणजे शौच तर अनुकूल-प्रतिकुल परिस्थितीमध्ये संतुष्ट राहणे म्हणजे संतोष होय. क्षुधा-तृष्णा, शीत-उष्ण इ. द्वद्वांचा स्वीकार करणे, संयमित जीवन यापन करणे, व्रत-मंत्र-जप-उपासना करणे म्हणजे तप होय. शारिरीक, मानसिक, वाचिक तपांचा उल्लेख प्रामुख्याने मिळतो. मोक्षदायी शास्त्राचे अध्ययन, श्रवण व मनन करणे म्हणजे स्वाध्याय होय तर ईश्वर प्रणिधान म्हणजे कोणत्याही फळाची अपेक्षा न करता ईश्वरार्पण करणे होय. अशाप्रकारे सुधारणा व परिवर्तन आणणाऱ्या कर्तव्यांच्या समुहाला नियम सांगितले आहे.
- **आसन :** यम-नियमाव्दारे केवळ नीतीतत्वे समजून उपयोग नाहीतर त्याचे योग्य पालन होण्यासाठी शारिरीक आणि मानसिक बल उत्तम असणे आवश्यक आहे. जे आसनाव्दारे प्राप्त होते. आसनामुळे शरीराला आणि मनाला उत्तम बल व स्थैर्यता लाभते. सर्व धातूंची पुष्टी, अग्निप्रदीपन, शरीर स्वास्थ्यता, प्रसन्नता, मन:शांती, शरीरालाघवता हे आसनांमुळे प्राप्त होते. भुजंगासन, पवनमुक्तासन, पद्मासन, त्रिकोणासन, शवासन इ. अनेक आसनांचा उल्लेख मिळतो.
- **प्राणायाम :** प्राण आणि आयाम या दोन शब्दांपासून प्राणायाम शब्दाची निर्मिती होते. प्राणाचा आयाम करणे, प्राणावर नियंत्रण, नियमन करणे म्हणजे प्राणायाम होय. प्राणायामामुळे चित्त एकाग्र होते, मनाला स्थैर्यता मिळते. दीर्घायु प्राप्त होते. पूरक, रेचक, कुंभक या प्राणायाम विधीच्या तीन अवस्था आहेत. प्राणायामाचे विविध प्रकार सहिंताकारांनी सांगितले आहे.
- **प्रत्याहार :** इंद्रिय संयम प्राप्तीकरीता उपयुक्त अंग म्हणजे प्रत्याहार होय. प्रत्याहार माणसाला अधर्माचरणापासून वाचवितो. प्रत्याहार म्हणजे ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिये यांना शिस्त लावणे, इंद्रियांनी आपापल्या विषयांपासून अलिप्त होऊन चित्ताच्या स्वरूपाला अनुसरून राहणे.
- धारणा : मनाला एकाग्र होण्याकरीता, चित्ताला विशिष्ट स्थानावर स्थिर करण्याची साधना म्हणजे धारणा होय.
- ध्यान : एका विशिष्ट ध्येय वस्तूवर चित्त एकाग्र करणे, दुसरीकडे लक्ष जाऊ न देता त्याच ध्येयाचे चिंतन करणे म्हणजे ध्यान होय.
- समाधि : अष्टांग योगातील अंतिम अंग असून शरीर, इंद्रिय, मन आणि आत्मा यांची समन्वय साधना म्हणजेच समाधि होय. धारणा आणि ध्यान यांची परिणती समाधि मध्ये होत असते.

अशाप्रकारे अष्टांग योगाचे वर्णन संहिताकारांनी केलेले आहे. त्यामुळेच योग म्हणजे केवळ आसन- प्राणायाम यांचाच विचार न करता आठही अंगे आत्मसात करण्याचा प्रयत्न करायला हवा. परंतू आसन, प्राणायाम इ. करीत असताना काही नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याने योग्य ज्ञान पारंगत असणाऱ्या ज्ञानी योगाभ्यासकांचे मार्गदर्शन घेणे हिताचे ठरते. योगाभ्यासामुळे शरीराला बळकटपणा येतो. जाठराग्निदीपन, शरीरालाघवता - स्थैर्यता प्राप्त होते. तसेच ताण-तणावांपासून मुक्ती मिळते व इच्छाशक्ती वाढते. मन:शांती लाभते तसेच अन्य व्याधींपासून दूर राहण्यास मदत होते.

योगसाधना ही एक परिपूर्ण साधनप्रणाली असून मानवी जीवनातील आरोग्यदायी कल्पतरू आहे. शरीर स्वास्थ राखण्याकरीता आणि व्याधी निवारण्याकरीता योगसाधनेचा मोठा वाटा आहे. मानवाच्या व्यक्तीमत्वाला योग्य घडण आणण्यासाठी, त्याला उत्तम पैलू पाडण्यासाठी, मानसिक स्थैर्य आणि उत्तम शारिरीक बल प्राप्तीसाठी योगाभ्यास ही सद्य:कालाची गरज आहे. अन्न, वस्त्र आणि याप्रमाणेच योग हा जीवनाचा घटक मानून त्याचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

**वैद्य-प्राजक्ता सोपान राख, पुणे**
B.A.M.S MD (Ayurveda), Mob : 8806429000

# शेतमजूर ते एस.टी.तील हेडआर्ट हा प्रवास पूर्ण

## एस.टी.च्या माध्यमातून परिवार सावरला !

घरची परिस्थिती बिकट असल्याने शिक्षण घेत असतानाच लोकाच्या शेतात कामाला जावे लागले. काम करून शिक्षण कसेबसे पूर्ण केले आणि मॅकेनिकलचे ट्रेनिंग घेऊन एसटीत सेवा करण्याची संधी मिळाली. या सेवेच्या माध्यमातून स्वत:सह परिवार उभा करून आपले स्वत:चे नाव काढले. ते म्हणजे केम येथील शिवाजी निवृत्ती केंगार हे आहेत.

केम येथील निवृत्ती केंगार व अनुसया केंगार यांचे शिवाजी केंगार हे चिरंजीव आहेत. त्यांचा जन्म १ जून १९६४ ला झाला असून, त्यांचे शिक्षण उत्तरेश्वर हायस्कुल केम येथे पूर्ण झाले. पुढील पदवीचे शिक्षण शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे पूर्ण झाले. दरम्यान मॅकेनिकलचे ट्रेनिंग घेतल्यावर त्यांनी १९८९ ला करमाळा आगारात हेल्पर म्हणून नोकरीस सुरूवात केली. करमाळा येथे कामाचा श्रीगणेशा झाल्यानंतर कुर्डूवाडी आगारात बदली झाली. त्यानंतर पुन्हा १९९३ ला बढतीवरती असिस्टंट ऑफ मॅकेनिक म्हणून करमाळा येथे बदली झाली. दरम्यानच्या कालावधीत त्यांनी मॅकेनिक व प्रमुख कारागीर अशा परीक्षा दिल्या व त्यात ते पास होऊन पुढे हेडआर्ट (प्रमुख कारागीर) म्हणून करमाळा येथे सेवा करत असताना ३१ मे २०२२ ला सेवानिवृत्त झाले आहेत. या कालावधीत त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. विशेषत: गिअरबॉक्स उचलून मशिनमध्ये ठेवणे हे खूप अवघड काम होते. सुरूवातीला मशिनरी नव्हत्या, परंतू कालांतराने मशिनरी आल्याने हा त्रास कमी झाला. नोकरीच्या कालावधीत तुकाराम विठोबा चौगुले यांच्या कन्या लक्ष्मीबाई यांचेबरोबर त्यांचा विवाह झाला. लग्नानंतर पत्नीची त्यांना पूर्ण साथ मिळाल्याने ते एसटीत काम करून जसा वेळ मिळेल त्या पध्दतीने गावाकडे जाऊन शेतीतही काम करत असत. त्यांनी स्वकष्टाने पाच एकर जमीन विकत घेतली होती व आवर्जुन आपल्या भावाच्या नावावर खरेदी घेतली. दुर्दैवाने ती जमीन भावाने परत दिली नाही. हे त्यांच्या आयुष्यातील फार मोठे दु:ख



शिवाजी केंगार सकाळी साडेपाचला उठतात. आंघोळ, देवपुजा, फिरायला जाणे, त्यानंतर नाष्टा करून मुलाच्या मेडिकलमध्ये जातात. दिवसभर मेडिकल दुकान शिवाय घरातील कामे. रात्री साडेदहा वाजता सर्वजण एकत्र जेवण करतात व दिवसाचा समारोप होतो. आपली मुलं सक्षमपणे स्वत:च्या पायावर उभी रहावीत; हे त्यांचे मुख्य स्वप्नं आहे.

आहे. परंतू त्यांनी ती गोष्ट फार मनाला न लावता आपल्या परिवाराकडे लक्ष दिले. त्यांना अक्षय (बी.फार्मसी, एलएलबी), अनिकेत (बी.फार्मसी), अनुराधा (बी.ए.) व अमृता (१२ वी सायन्स) अशी चार मुले असून चारही मुले हुशार आहेत. मोठ्या मुलीचे लग्न झालेले आहे. इतर मुलांचे अद्याप लग्न व्हायचे आहेत. छोट्या मुलाने मेडिकलचे दुकान टाकले असून बी.फार्मसीचे शिक्षण त्याचे पूर्णत्वास येत आहे. मोठा मुलगा बी.फार्मसी होऊन तो एलएलबी ही पूर्ण झालेला आहे. लवकरच तो बारकौन्सीलची सनद घेऊन वकील म्हणून कार्यरत होणार आहे.

श्री.केंगार हे सेवानिवृत्त झाल्याच्या निमित्ताने मित्र परिवाराने त्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतसाहित्याचे अभ्यासक ॲड.डॉ.बाबूराव हिरडे हे होते. तसेच एसटीतील मॅकेनिकल डिपार्टमेंटचे प्रमुख श्री.रोमण याबरोबरच प्रा.दुरगुडे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रमेश कवडे, शिक्षक अशोक नामदास, पोलीस कॉन्स्टेबल सचिन खराडे तसेच बागायतदार बाजीराव शिंदे उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत अक्षय केंगार, अनिकेत केंगार, लहू केंगार यांनी केले. यावेळी शिवाजी केंगार व त्यांच्या पत्नी सौ.लक्ष्मी केंगार या उभयतांचा सत्कार करण्यात आला.

# कामाबरोबरच कर्मचारी संघटनेचे काम करत सर्वसामान्यांना न्याय दिला : प्रदीप शिंदे

स्वत:च्या नोकरीबरोबरच सर्वसामान्य कामगारांना न्याय देण्याच्या दृष्टीने करमाळा नगरपरिषदेतील घरपट्टी वसुली लिपीक प्रदीप नामदेव शिंदे यांनी आपली कारकिर्द गाजवली. ते २७ वर्षाच्या सेवेनंतर ३१ मे २०२२ ला सेवानिवृत्त झाले आहेत.

प्रदीप शिंदे यांचे मुळ गाव करमाळा हे असून मंडल अधिकारी कै.नामदेव पांडूरंग शिंदे व पंचायत समितीतील नाईक सौ.गंगुबाई नामदेव शिंदे यांचे ते सुपुत्र आहेत. संजय (प्रकाश) व मोहन हे दोन बंधू असून नलिनी नामदेव शिंदे या त्यांच्या भगिणी शिक्षिका आहेत. त्यांचे शिक्षण पहिली ते सातवी हे सेंट्रल स्कुल नं.१ येथे तर आठवी ते दहावी महात्मा गांधी हायस्कुल तर अकरावी ते पदवी पर्यंत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात झाले. शिक्षणानंतर त्यांनी १९८४ साली जकातनाक्यावर करमाळा नगरपरिषदेकडे काम सुरू केले. परंतू पुढे नगरपरिषदेने कमी केल्यावर त्यांना न्यायालयात जाऊन आपली नोकरी पक्की करून घ्यावी लागली. त्यानंतर ते १मे १९९५ ला नगरपालिकेत घरपट्टी विभागात कायम झाले. नोकरी करत असतानाच दौंड येथील अंकुश बाबूराव बारवकर यांच्या कन्या पुष्पा यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. त्यांना प्रफुल्ल व प्रशांत अशी दोन मुले आहेत. पैकी प्रफुल्ल याने स्वत:चे मोबाईल शॉपीचे दुकान टाकले आहे. तर प्रशांत हा बँकेत नोकरीला असून पुनम हिचा विवाह झालेला आहे. त्यांच्या पत्नी सौ.पुष्पा यांची त्यांना पूर्ण साथ मिळाल्याने शिंदे हे आपल्या नोकरीबरोबरच भारतीय मजदूर संघ या कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष म्हणून जवळपास २९ वर्षे



प्रदीप शिंदे हे सकाळी पाच वाजता उठतात. आंघोळ वैगरे करून शेतात जातात. पुन्हा आठ वाजता शेतातून घरी येऊन नाष्टा करणे, त्यानंतर घरातील कामे, नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची कामे असे करतात. दुपारी एक वाजता जेवण, विश्रांती व पुन्हा शेतात जाऊन काम करतात. यापुढे जास्तीत जास्त वेळ कर्मचारी संघटनेसाठी देणार असून समाजकार्यात वेळ खर्च करणार असल्याचेही शिंदे यांनी सांगितले आहे.

कार्यरत आहेत व कर्मचाऱ्यांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन माजी मंत्री सुभाष बापू देशमुख यांचे हस्ते गुणवंत कामगार हा पुरस्कार तर माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे हस्ते कोरोना योध्दा हा पुरस्कार तर यशकल्याणी संस्थेमार्फत मानपत्र देऊन सत्कार केला आहे. पूर्वीपासून त्यांनी आषाढी यात्रेच्या कालावधीत वारकऱ्यांच्या भोजनापासून ते निवासापर्यंतची व्यवस्था तर निवडणुकीच्या कालावधीत तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांना कायम मदत केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन १ जूनला त्यांच्या मित्र परिवाराने सेवानिवृत्तीचा मोठा समारंभ परिपूर्ण केलाआहे.

उत्तम कंडिशन मधील
ओमीनी गाडी विकणे
संपर्क : ८८८८२४१६७४

आनंद ड्रायफ्रुटस्
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट
• खास उन्हाळ्याकरीता...
थंडाई बोटल, ताक मसाला, कोकम सरबत, आवळा कँडी, वाळा सरबत, रसना, सब्जा बी, वाळा जुडी, रोझ सिरप, आईस्क्रिम पावडर, खडीसाखर, प्रदाळयुक्त गुलकंद, पापड आटा, पापड मसाला, पापड खार, मोहरी डाळ, मेथी,लोणचे मसाले...
एकवेळ अवश्य भेट द्या..!
एच.यु.गुगळे कापड दुकान समोर, मेनरोड, करमाळा.